# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः16.09.2024** **वारःसोमवार**

---

1. सरकारी नोकऱ्यांच्या पलीकडे इतर रोजगारसंधींना गवसणी घाला- उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचं विद्यार्थ्यांना आवाहन
2. विस्तारीत रेल्वे जाळ्यामुळे पूर्व भारतातल्या आर्थिक विकासाला प्रोत्साहन मिळेल- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विश्वास
3. पुण्यातल्या पहिल्या वंदे भारत रेल्वेसह राज्यातल्या तीन गाड्यांचं पंतप्रधानांच्या हस्ते आज लोकार्पण; खासदार मुरलीधर मोहोळ पुण्यात दाखवणार हिरवा झेंडा
4. स्वभाव स्वच्छता-संस्कार स्वच्छता संकल्पनेसह देशभरात उद्यापासून स्वच्छता ही सेवा अभियानाला सुरुवात
5. स्टार्टअप्स परिसंस्थेला बळ देण्यासाठी भास्कर या नव्या डिजीटल मंचाची सुरुवात आणि
6. चौथ्या हॉकी इंडिया आंतरविभागीय अजिंक्यपद स्पर्धेत पेट्रोलियम क्रिडा प्रोत्साहन मंडळ संघाला जेतेपद

**<u>उपराष्ट्रपती</u>**

भारतीय राज्यघटना ही सर्वार्थाने वैशिष्ट्यपूर्ण असून, भारतीय राज्यघटनेबाबत नवीन पिढीमध्ये जागृतीसाठी संविधान मंदिर नक्कीच प्रेरणादायी ठरेल, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी काल मुंबईत केल. राज्यातल्या 434 औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये संविधान मंदिराचं लोकार्पण मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयातल्या कार्यक्रमात दूरस्थ पद्धतीनं केल्यानंतर ते बोलत होते. यावेळी उपराष्ट्रपती यांच्या पत्नी डॉ. सुदेश धनखड, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, नागपूरातून दूरस्थ प्रणालीद्वारे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आदि उपस्थित होते. भारतीय संस्कृतीचे सार आपल्या संविधानात सामावले आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान निर्मितीमध्ये मोठं योगदान आहे. सामाजिक न्याय हा आरक्षणाचा आधार असून वंचितांना मुख्य प्रवाहात आणण्यावर भर देण गरजेचे आहे, असं धनखड म्हणाले. डॉ. आंबेडकर यांचे योगदान नव्या पिढीला समजणे गरजेचे असून त्यादृष्टीने संविधान मंदिर उपक्रम अतिशय उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आपल्या राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 1904 ते 1907 या काळात शिक्षण झाले त्याठिकाणी आपण उभे आहोत याचा अभिमान वाटतो, अशी भावना राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी व्यक्त केली.

**<u>पंतप्रधान-वंदेभारत</u>**

पूर्व भारतातल्या विस्तारित रेल्वे जाळ्यामुळं संपूर्ण प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी मिळणार असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. झारखंड राज्याची राजधानी रांची इथं ते काल बोलत होते. पंतप्रधानांच्या हस्ते दूरस्थ प्रणालीच्या माध्यमातून काल साडेसहाशे कोटी रुपयांहून अधिक किंमतीच्या विविध रेल्वे प्रकल्पांचं भूमीपूजन तसंच लोकार्पण करण्यात आलं. याचवेळी पंतप्रधानांनी दूरस्थ माध्यमातून सहा नव्या वंदे भारत रेल्वेगाड्यांना हिरवा झेंडा दाखवला. पंतप्रधान जमशेदपूरमधल्या टाटानगर इथून या गाड्यांना हिरवा झेंडा दाखवणार होते. मात्र वाईट हवामानामुळे पंतप्रधानांचे हेलिकॉप्टर उड्डाण न करु शकल्यानं त्यांनी रांचीमधून दूरस्थ पद्धतीनं या गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला. भारतातल्या विस्तारीत रेल्वेजाळ्यामुळे व्यवसाय, उद्योग, व्यावसायिक तसंच विद्यार्थ्यांनाही मोठ्या प्रमाणात फायदा होणार असल्याचं सांगताना वंदे भारत रेल्वेगाड्यांमुळे तरुणांसाठी नवे रोजगार उभे राहात असल्याचं मोदी यांनी सांगितलं.

**<u>वंदेभारत-मोहोळ</u>**

महाराष्ट्रातही पुण्यातून सुरु होणाऱ्या पहिल्या वंदे भारत एक्सप्रेससह तीन नव्या वंदे भारत एक्सप्रेसचं लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दूरस्थ पद्धतीनं होणार आहे. यामध्ये पुणे-हुबळी; कोल्हापूर-पुणे आणि नागपूर-सिकंदराबाद या तीन रेल्वे गाड्यांचा समावेश आहे. केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री तसंच पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ पुण्यातून या 'वंदे भारत' रेल्वेला हिरवा झेंडा दाखवणार आहेत. त्यानंतर ही रेल्वे हुबळीसाठी रवाना होईल. पुणे-हुबळी आणि कोल्हापूर-पुणे या दोन्ही गाड्या प्रत्येकी तीन दिवस धावणार आहेत.

**<u>स्वच्छता सेवा</u>**

देशभरात उद्यापासून 'स्वच्छता ही सेवा' अभियानाला सुरूवात होत आहे. हे अभियान गांधी जयंतीपर्यंत म्हणजेच दोन ऑक्टोबर पर्यंत सुरू राहाणार आहे. 'स्वभाव स्वच्छता-संस्कार स्वच्छता' ही यावर्षीच्या अभियानाची मुख्य संकल्पना आहे. या अंतर्गत लोकसहभागातून श्रमदान आणि सामूहिक कार्याच्या माध्यमातून पर्यटन स्थळं, सार्वजनिक इमारती, व्यावसायिक परिसर, जलाशय, प्राणीसंग्रहालय, अभयारण्य आणि सार्वजनिक स्वच्छतागृह सारख्या ठिकाणी स्वच्छता मोहिम राबवण्यात येणार आहेत. सर्व केंद्रीय तसच राज्य मंत्रालयं लोकसहभागातून विविध योजना राबवणार आहेत. संपूर्ण समाजाचा विचार करण्याचा दृष्टीकोन बाळगून स्वच्छता लक्ष्य विभाग, श्रमदान उपक्रम-स्वच्छतेमध्ये लोकसहभाग आणि स्वच्छतामित्र सुरक्षा शिबिर हे तीन घटक या मोहिमेचे प्रमुख आधारस्तंभ असतील. या अभियानात देशभरातले नागरिक, उद्योग, स्वयंसेवी संस्था, विकास संस्था यांसह विविध स्थानिक स्वराज्य संस्थाना सहभागी करुन घेण्यात येणार आहे.

**<u>स्टार्टअप मंच</u>**

देशातल्या स्टार्टअप परिसंस्थेला बळकट करण्याच्या उद्देशाने उद्योग संवर्धन आणि अंतर्गत व्यापार विभाग म्हणजेच DPIIT कडून भास्कर नावाच्या डिजीटल मंचाची सुरुवात करण्यात येणार आहे. भारत स्टार्टअप नॉलेज ॲक्सेस रजिस्ट्री म्हणजेच भास्कर हा मंच उद्योजकीय परिसंस्थेतील प्रमुख भागधारकांमधलं सहकार्य केंद्रीकृत, सुव्यवस्थित आणि वृद्धींगत करण्याच्या उद्देशानं हा मंच स्थापन करण्यात आला आहे. हा उपक्रम भारताला नवोन्मेष आणि उद्योजकता क्षेत्रात जागतिक नेतृत्व करण्याच्या सरकारच्या दृष्टीकोनाशी सुसंगत कार्य करेल. यामुळे स्टार्टअप्स, गुंतवणूकदार, मार्गदर्शक आणि इतर भागधारक यांच्यातली दरी कमी करुन सर्व क्षेत्रांमध्ये अखंड संवाद साधता येईल असं वाणिज्य आणि मंत्रालयानं प्रसिद्धीला दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<u>व्हिएतनाम मदत</u>**

यागी चक्रीवादळामुळे बाधित झालेल्या देशांना मानवतेच्या दृष्टिकोनातून मदत देण्यासाठी भारताने ऑपरेशन सद्भाव सुरू केले आहे. या अंतर्गत भारताने व्हिएतनामला 10 लाख डॉलरची मदत पाठवल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे. काल एका विशेष विमानाने 35 टन साहित्याची मदत व्हिएतनामला रवाना करण्यात आली. त्यात जलशुद्धीकरणाच्या वस्तू, पाण्याचे डबे, गरम चादरी, स्वयंपाकघरातील भांडी आणि सौर कंदील यांचा समावेश आहे. नवी दिल्लीमधून विशेष विमानात दहा टन मदत पुरवठा लाओसला पाठवला आहे.

**<u>ईद सुट्टी</u>**

देशभरात आज साजऱ्या होणाऱ्या ईद ए मिलादनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मुस्लीम समुदायाला शुभेच्छा दिल्या आहेत. प्रेषिद मोहम्मद पैगंबरांनी प्रत्येकाला प्रेम आणि बंधुत्वाच्या भावनांना बळ देण्यासाठी प्रेरित केलं. त्यांनी समाजात दया, मानवतेचा प्रसार केला, असं सांगून राष्ट्रपतींनी मुस्लीम समुदायाला पवित्र कुराणातली शिकवण आत्मसात करण्याचं आवाहन त्यांनी केलं. ईद ए मिलादची सार्वत्रिक सुट्टी मुंबई महानगर, उपनगर वगळता राज्यात सर्वत्र आज कायम ठेवण्यात आली आहे. मुंबई महानगर आणि उपनगरांमध्ये मात्र ही सुटी 18 सप्टेंबरला जाहीर करण्यात आली आहे. स्थानिक मुसलमान समाजाच्या विनंतीवरून राज्य सरकारनं मुंबईसाठी सुटीतील बदल केला आहे. अनंत चतुर्दशीच्या मिरवणूकीत अडथळा होऊ नये म्हणून मुस्लिम समाजानं मिरवणुकीचा दिवस बदलला आहे.

**कोलकाता-कोठडी**

पश्चिम बंगालमध्ये आर जी कर वैद्यकीय महाविद्यालयाचे माजी प्राचार्य संदीप घोष आणि तळा पोलिस स्टेशनचे माजी प्रभारी अधिकारी अभिजित मंडल यांना तीन दिवसांची सीबीआय कोठडीत देण्यात आली आहे. त्यांना काल सियालदह न्यायालयात हजर करण्यात आले. पुराव्यांमध्ये हस्तक्षेप करणं आणि घटनेत प्राथमिक माहिती अहवाल दाखल करण्यास विलंब केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला होता. दरम्यान या प्रकरणातील दोन्ही आरोपींना सीबीआय अर्थात केंद्रीय अन्वेषण विभागाने काल रात्री अटक केली.

**आशियाकप हॉकी**

आशियाई हॉकी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत उपांत्यफेरीत चीनच्या हुलुनबुर येथे आज भारताचा सामना दक्षिण कोरियाशी होणार आहे. या स्पर्धेत भारत हा एकमेव अपराजित संघ आहे. भारताने या स्पर्धेत चीनचा 3-0, जपानचा 5-1, मलेशियाचा 8-1, कोरियाचा 3-1 आणि पाकिस्तानचा 2-1 असा पराभव केला आहे. तर पहिल्या उपांत्य फेरीत पाकिस्तानचा सामना चीनशी होणार आहे.

**हॉकी**

पुण्यात झालेल्या वरिष्ठ पुरुष गटाच्या चौथ्या हॉकी इंडिया आंतरविभागीय राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत पेट्रोलियम स्पोर्ट्स प्रमोशन बोर्डने जेतेपद राखलं. सलग दुसऱ्यांदा त्यांनी विजेतेपदावर नाव कोरलं. गेल्या वेळी उपविजेता ठरलेल्या रेल्वे स्पोर्ट्स प्रमोशन बोर्ड संघाचा पेट्रोलियम स्पोर्ट्स प्रमोशन बोर्डने पेनल्टी शूटआउटवर 3-2 असा पराभव केला. सुमीत कुमार, शिलानंद लाक्रा तसंच कर्णधार देविंदर वाल्मिकीने गोल केले. तत्पूर्वी तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या लढतीत सेवा क्रीडा नियामक मंडळ संघाने भारतीय अन्न महामंडळ संघाचा पराभव करत तिसरं स्थान राखलं. महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे सरचिटणीस नामदेव शिरगावकर यांच्या हस्ते बक्षीस वितरण झालं.

**हवामान**

पश्चिम बंगालवरील खोल दबावामुळे आज बिहार, झारखंड, ओडिशा आणि छत्तीसगडमध्ये काही ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज भारतीय हवामान खात्याने वर्तवला आहे. गेल्या सहा तासांत हा दाब ताशी पाच किलोमीटर वेगाने पुढे सरकला असल्याचं हवामान विभागाने म्हटलं आहे. पुढील 48 तासांत त्याची तीव्रता कमी होऊन झारखंड आणि छत्तीसगडमधून वायव्येकडे सरकण्याची शक्यता आहे. दरम्यान महाराष्ट्रात आज सर्वच विभागांमध्ये तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे.

# याचबरोबर राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.